**तातडीचे / महत्त्वाचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र,
जा.क्र.नासुकें/१/कावि/५७७/२०१६
दि. २९/१२/२०१६.

**विषय :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत देण्यात येणाऱ्या सेवांच्या मासिक अहवालाबाबत...**

परिपत्रक

प्रशासनामध्ये उत्तरदायित्व, जबाबदारी व पारदर्शकता आणण्यासाठी, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याची तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ दि.२८/४/२०१५ रोजी लागू केला आहे. या अध्यादेशाखाली कलम ३(१) नुसार अधिसूचना प्रसिध्द करणेत आलेली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून एकूण १५ सेवा नागरिकांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, नव्याने शालेय शिक्षणासंबंधी अजून ३ सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत. अशा एकूण १८ सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार पिंपरी चिंचवड मनपाच्या संबंधित विभागांमार्फत नागरीकांना या सेवा पुरविल्या जात आहेत. सदर सेवांसाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली असून लोकसेवेकरीता प्राप्त झालेले अर्ज व त्यावर करण्यात आलेली कार्यवाही याबाबतचा मासिक अहवाल विवरणपत्र "ब" व "क" मध्ये प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत पाठविणेसंबंधी शासनाने क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि२० दि.०४/१२/२०१५ अन्वये कळविले आहे. त्यानुसार संबंधित विभागांकडून सदरचा मासिक अहवाल प्रत्येक महिन्याच्या २ तारखेपर्यंत नागरी सुविधा केंद्र विभागाकडे पाठविणेसंबंधी याआधीच कळविले आहे.

परंतु, माझे असे निदर्शनास आले आहे की, काही विभागांकडून मासिक अहवाल वेळेत पाठविला जात नसल्याने अहवाल शासनास पाठविणेस अडचणी निर्माण होत आहेत. तरी संबंधित विभागांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ चा मासिक अहवाल त्याच्या पुढील प्रत्येक महिन्याच्या २ तारखेपर्यंत नागरी सुविधा केंद्र विभागाकडे पाठवावा. जेणेकरुन शासनास अहवाल वेळेत सादर करणे शक्य होईल.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ चा आढावा दर महिन्याला मा.मुख्यमंत्री यांचेमार्फत घेणेत येत असल्याने अहवाल नागरी सुविधा केंद्र विभागाकडे पाठविण्याची संबंधित विभागप्रमुखांनी दक्षता घ्यावी. अहवाल वेळेत न पाठविला गेल्यास संबंधित विभागप्रमुखांवर कडक कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.

आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

प्रति :-

सर्व संबंधित विभागप्रमुख,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,